# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग
### कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,उस्मानाबाद तथा समन्वय अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद,बीड व लातुर
**दुरध्वनी क्र.०२४७२-२२२८८२/८३**

**भरती सन -२०१४**

**शिपाई/चौकीदार (सरळ सेवा) (वर्ग-४-ड) यांची रिक्त पदे भरणे बाबत जाहिरात क्र.१ सन-२०१४**

**वेबसाईट- http://pwd.erecruitment.co.in**

---

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद, बीड व लातुर यांच्या अधिपत्याखाली असलेल्या आस्थापनेवरील उस्मानाबाद, बीड व लातुर जिल्हयातील विविध कार्यालयातील गट - ड संवर्गातील मागासवर्ग आरक्षणातील व खुल्या प्रवर्गातील सरळसेवेने शिपाई / चौकीदार रिक्त पदे भरणे करीता पात्र उमेदवारांकडुन महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे (एमकेसीएल) यांचे मार्फत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीसाठी विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने http://pwd.erecruitment.co.in या संकेतस्थळावर आवेदन अर्ज दिनांक १९/०८/२०१४ पासुन मागविण्यात येत आहेत.

या बाबतचा संवर्गनिहाय पदनिहाय तपशील खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे. सदरचा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद तथा समन्वय अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद,बीड व लातुर करीता यांना राहतील.

खेळाडु, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त, महिला कर्मचारी यांचेकरीता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असुन ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ठ आहे. समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.

**उस्मानाबाद जिल्हयात भरावयाच्या पदांची माहिती**

**शिपाई/चौकीदार वेतन बँड :- ४४४०-७४४० ग्रेड वेतन -१३००/-**

**एकुण पदसंख्या :- ११**

| **पद शिपाई /चौकीदार** | | **जिल्हा उस्मानाबाद** | **नियंत्रक अधिकारी : कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, उस्मानाबाद** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **समातंर आरक्षण** | | | | | | | |
| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | एकुण भरावयाची पदे | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूंकप ग्रस्त २% | अंशकालीन उमेदवार १०% | खेळाडू ५% | समांतर आरक्षण व्यतिरिक्त |
| १ | अ. जाती | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | अ. जमाती | - | - | - | - | - | - | - | - |
| ३ | वि. जा. (अ) | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | भ. ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | भ. ज. (क) | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ६ | भ. ज. (ड) | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ७ | वि. मा. प्र. | - | - | - | - | - | - | - | - |
| ८ | इ. मा. व. | ५ | २ | १ | - | - | - | - | २ |
| ९ | खुला | ३ | १ | - | - | - | - | - | २ |
| १० | शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ११ | विशेष मागास प्रवर्ग-अ | - | - | - | - | - | - | - | - |
| | **एकुण** | **११** | **३** | **१** | **-** | **-** | **-** | **-** | **७** |

**बीड जिल्हयात भरावयाच्या पदांची माहिती**
**शिपाई/चौकीदार वेतन बँड :- ४४४०-७४४० ग्रेड वेतन -१३००/-**
**एकुण पदसंख्या :- ०३**

| **पद शिपाई /चौकीदार** | | **जिल्हा बीड** | **नियंत्रक अधिकारी : कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, बीड** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **समातंर आरक्षण** | | | | | | | |
| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | एकुण भरावयाची पदे | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूंकप ग्रस्त २% | अंशकालीन उमेदवार १०% | खेळाडू ५% | समातंर आरक्षण व्यतिरिक्त |
| १ | अ. जाती | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | अ. जमाती | ३ | १ | - | - | - | - | - | २ |
| ३ | वि. जा. (अ) | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | भ. ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | भ. ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | भ. ज. (ड) | - | - | - | - | - | - | - | - |
| ७ | वि. मा. प्र. | - | - | - | - | - | - | - | - |
| ८ | इ. मा. व. | - | - | - | - | - | - | - | - |
| ९ | खुला | - | - | - | - | - | - | - | - |
| १० | शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | - | - | - | - | - | - | - | - |
| ११ | विशेष मागास प्रवर्ग-अ | - | - | - | - | - | - | - | - |
| | **एकुण** | **०३** | **१** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **२** |

**लातूर जिल्हयात भरावयाच्या पदांची माहिती**
**शिपाई/चौकीदार वेतन बँड :- ४४४०-७४४० ग्रेड वेतन -१३००/-**
**एकुण पदसंख्या :- ०७**

| **पद शिपाई /चौकीदार** | | **जिल्हा लातुर** | **नियंत्रक अधिकारी : कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, लातुर** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **समातंर आरक्षण** | | | | | | |
| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | एकुण भरावयाची पदे | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूंकप ग्रस्त २% | अंशकालीन उमेदवार १०% | खेळाडू ५% | समातंर आरक्षण व्यतिरिक्त |
| १ | अ. जाती | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | अ. जमाती | - | - | - | - | - | - | - | - |
| ३ | वि. जा. (अ) | २ | - | - | - | - | - | - | २ |
| ४ | भ. ज. (ब) | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | भ. ज. (क) | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | भ. ज. (ड) | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ७ | वि. मा. प्र. | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ८ | इ. मा. व. | २ | - | - | - | - | - | - | २ |
| ९ | खुला | - | - | - | - | - | - | - | - |
| १० | शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ११ | विशेष मागास प्रवर्ग-अ | - | - | - | - | - | - | - | - |
| | **एकुण** | **७** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **७** |

**अ) सर्वसामान्य अटी :**

**१)** अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र (डोमिसाईल सर्टिफिकेट) त्यांचेकडे असणे आवश्यक आहे.

**२)** सरळसेवा भरती प्रक्रीया संदर्भातील सविस्तर जाहिरात http:// pwd.erecruitment.co.in. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळावर वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियाबाबतची अद्यावत माहिती मिळवण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. लेखी परीक्षा कागदपत्रे छाननी, प्रवेशपत्र, निकाल व इतर विविध सुचना या संकेतस्थळावरुन वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील. (याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.)

**३)** उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने शैक्षणिक कागदपत्रे,अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. व विहीत स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) चलनाव्दारेच प्रक्रिया शुल्क स्विकारण्यात येईल. ऑनलाईन प्रध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.

**४)** उमेदवार लेखी परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे पुर्ण तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेले गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणताही हक्क राहणार नाही. मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतर व मुलाखतीनंतर उमेदवारांच्या गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

**५)** विहीत अर्हता व वयोमर्यादा कोणत्याही बाबतीत शिथील केली जाणार नाही. जाहिरातील नमुद दिनांकास विहीत अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवरांनी अर्ज करु नयेत.

**६)** अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतुन काढुन टाकण्यास पात्र राहील व भारतीय दंड विधान संहितेचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

**७)** निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यातील वाद व तक्रारीबाबतचा अंतीम निर्णय घेणेचा अधिकार अध्यक्ष,सा.बां.परिमंडळ तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद / बीड / लातुर यांचा असेल.

**८)** माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अन्वये भरती प्रक्रीये बाबतची माहिती जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासुन पुढील ०६ महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध होऊ शकेल. तद्‌नंतर या प्रकरणाबाबत प्राप्त अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

**ब) वयोमर्यादा :-** सर्व उमेदवारांचे वय दिनांक १९/०८/२०१४ रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

१) **दिनांक १९/०८/२०१४ रोजीचे किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे.**

२) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे पुर्णपेक्षा अधिक नसावे.

३) मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ३८ वर्षे पुर्ण पेक्षा अधिक नसावे.

४) वरील २ व ३ मधील यांच्या मर्यादेला पुढील अपवाद असतील.

५) शासकीय सेवेतील कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष पुर्णपेक्षा अधिक नसावे.

६) माजी सैनिक : सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिका मधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवा काल अधिक ३ वर्षे एवढा काल त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातुन वगळुन त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्ष पुर्णपेक्षा अधिक नसावे.

७) सर्व प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयामर्यादा ४५ वर्ष पुर्णपेक्षा अधिक नसावे.

**क) उमेदवाराची अर्हता :-**

उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हतता इयत्ता चौथी उत्तीर्ण असावी.

**ड) इतर अटी :-**

१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अंतिम निवड झाल्यानंतर संबंधीत नियुक्ती प्राधिका-याकडे अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी लिहीता,वाचता येणे आवश्यक आहे.

२) नियुक्तीपुर्वी पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे,शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला, तसेच आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकित प्रमाणपत्र (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोष्टमास्तर / प्राचार्य अथवा व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे.) इ. ची छाननी संबंधीत नियुक्ती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद / बीड / लातुर यांचे स्तरावर केली जाईल. तसेच त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास निवड रद्द केली जाईल.

३) उमेदवारांच्या लेखीपरीक्षेचे ठिकाण उस्मनाबाद / बीड / लातुर येथे राहील. परिक्षाकेंद्राचा संकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इ. तपशील पात्र उमेदवारांना उक्त संकेतस्थळावर उपलब्ध होईल. परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

४) उमेदवारास परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.

५) जिल्हा रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्यविकास कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

६) विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत, व अशा परवानगीची प्रत नियुक्तीचे वेळी सादर करावी लागेल.

७) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल.

८) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसुचित जमाती, निरधिसुचीत जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती,विशेष मागासप्रवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८ ) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व वि.जा. (अ) भ.ज.(ब) भ.ज.(क) आणि भ.ज.(ड) विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागु आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत

नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१४ नंतरचे (नॉन क्रिमीलेयर) प्रमाणपत्र / नुतनीकरण प्रमाणपत्र नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/ २००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.-४१५/का-२ दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१/०३/२०१३ नंतरचे (नॉन क्रिमीलेयर) प्रमाणपत्र / नुतनीकरण प्रमाणपत्र नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०) सामान्य प्रशासन विभाग,शासन अधिसुचना क्र.एसआरव्ही-२००-प्र.क्र.१७ (२०००)/१२ दिनांक २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.-१७/२००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे अर्जदाराने विहीत नमुन्यातील नियुक्तीचे वेळी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडाविभाग क्रमांक रक्रिधो-२००२/प्र.क्र.-६८/क्रियुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्यच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्चवयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडु प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ट- अ मधील नमुद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे असावे. खुल्या प्रवर्गातील खेळाडुंना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१/०३/२०१३ नंतरचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र / नुतीनीकरण प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित / साक्षांकित प्रत, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करावी लागेल.

१३) **(अ)** भुकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हाधिकारी) यांचे भुकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहीत केलेले प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**(ब)** प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हा पुनर्वसन अधिकारी) यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहीत केलेले प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४) अपंग प्रवर्गातील उमेदवारांने किमान प्रमाण ४०% असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र व याबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन प्रथम कागदपत्रे पडताळणीचेवेळी व नंतर नियुक्तीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावर उमेदवारांचा फोटो असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शिफारशीनंतर व नियुक्तीचेळी शासन निर्णय २३/०६/२००८ अनुसार उमेदवाराला पुनःश्च वैद्यकीय बोर्डाचे तपासणीसाठी जावे लागेल व वरील तपासणी अंती प्रमाणपत्र अवैध असल्यास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येणार नाहीत.

१५) अपंग प्रवर्गातील उमेदवारास लेखी परीक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच परिक्षा शुल्क व्यतिरिक्त लेखनिकाची परिक्षेच्या एक सत्राचे शुल्क रक्कम रुपये १००/- स्वतंत्रपणे कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद तथा समन्वय अधिकारी यांच्या कार्यालयात जमा करावी लागेल व ती ना परतावा राहील.

१६) सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण या बाबत बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, उस्मानाबाद तथा समन्वय अधिकारी, उस्मानाबाद, बीड व लातुर करीता यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहे. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इत्यादी बाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद / बीड / लातुर यांचा निर्णय अंतिम राहील.

१७) नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ अनुसार लागु करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (Contributory Fund) लागु राहील.

१८) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल / शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

१९) सदरची पदे अस्थायी स्वरुपाची असुन शासनाच्या धोरणाअंती उमेदवाराची सेवा एक महिन्याची नोटीस देऊन केव्हांही समाप्त करण्यात येईल.

२०) या भरती प्रक्रीया अंतर्गत नियुक्ती होणा-या सर्व उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा / तरतुदी लागु होतील.

**(इ) परीक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | संवर्ग | लेखी परीक्षा एकुण गुण | मुलाखत |
|---|---|---|---|
| **१** | **शिपाई** | **७५** | **२५** |

२) उमेदवाराच्या लेखी व मुलाखतीतील प्राप्त गुणानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

**(ई) निवड प्रक्रिया व नियुक्ती :-**

१) लेखी परीक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांची लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे अंतरीम एकत्रित गुणवत्ता यादी http:// pwd.erecruitment.co.in संकेतस्थळावर जाहिर (प्रसिध्द) केली जाईल.

२) या गुणवत्ता यादीतुन सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतरीम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहिर केले जाईल.

३) ज्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव होईल, अशा उमेदवारांची यादी http:// pwd.erecruitment.co.in संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या

सुचनांनुसार त्यांच्या कागदपत्र छाननीसाठी ठरवुन दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मुळ कागदपत्रे व छायांकीत (साक्षांकीत) प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी, वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास, त्याचे नांव गुणवत्ता यादीतुन काढुन टाकले जाईल. याबाबत कोणतीही विनंती / तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४) वरील प्रमाणे गुणवत्ता यादीतील उमेदवारांची कागदपत्रांच्या छाननीनंतर व मुलाखतीनंतर अंतरीम निवडयादी तयार केली जाईल.

५) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

(i) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यांनतर

(ii) मागासवर्गीय व मागासवर्गीय उमेदवारांच्या मध्ये प्रथम अनुसुचित जमाती, नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी ९० पुर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानेतर

(iii) शारीरीकदृष्टया अपंग असलेले उमेदवार,त्यानंतर

(iv) माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

(v) स्वातंत्र सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर

(vi) वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल) वरील प्रत्येत संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

६) उमेदवाराने लेखी परीक्षेत व मौखिक चाचणीत मिळालेल्या गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल. अंतरीम निवडयादी मधुन पदांच्या सामाजिक / समांतर आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

७) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश निर्गमित होणेपुर्वी नियुक्ती अधिका-यांकडे सर्व मुळ कागदपत्रे वैधता तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतरच उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

८) नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन रुजू होणे अनिवार्य आहे.

९) शासन सेवेत नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.-२०१०/१०/१२, दिनांक ०३/०६/२०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र विनंतीनुसार बदलीसाठीच्या तरतुदी लागु राहतील.

१०) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद अंतर्गत कोणत्याही विभागात अथवा उपविभागात देण्यात येईल. तसेच त्यांना औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम परिमंडळांतर्गत कोठेही बदलीवर जावे लागेल.

११) शिपाई / चौकीदार वर्ग-४ या पदावर निवड झाल्यानंतर उच्च अर्हता प्राप्त उदा. एस.एस.सी./एच.एस.सी/पदवी/ पदविधारक यांना उच्च अर्हतेचे लाभ देय राहणार नाहीत. तसे बंधपत्र त्यांना नियुक्तीपुर्वी देणे बंधनकारक आहे.

**फ) ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी मार्गदर्शन व सुचना :-**

१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक १९/०८/२०१४ व सकाळी १०.०० वाजले पासुन.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरयाचा अंतिम दिनांक ०२/०९/२०१४ रोजी व वेळ सायं. ५.०० पर्यंत.

३) संगणकीय चलनाव्दारे भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये प्रक्रिया शुल्क स्वीकृत्ती चा अंतिम दिनांक ०४/०९/२०१४.

४) ज्या उमेदवारांनी दिनांक ०२/०९/२०१४ रोजी अर्ज दाखल केले आहेत व ज्या उमेदवारांनी दिनांक ०४/०९/२०१४ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्या उमेदवारांसाठी उरलेला अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक ०६/०९/२०१४ हा राहील.

५) परीक्षासाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक व लेखीपरीक्षेचा दिनांक वेळ व स्थळ इत्यादी विषयाची माहिती http:// pwd.erecruitment.co.in. या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**परीक्षा शुल्क :-** सदर भरतीप्रक्रियेत खालील परीक्षा शुल्क आकारले जाईल.

१) खुला प्रवर्ग :- **रुपये ३००/- (रुपये तीनशे) (अपंग अर्जदारासह)**

२) मागास प्रवर्ग :- **रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) (अपंग अर्जदारासह)**

३) माजी सैनिक :- **परीक्षा शुल्क नाही.**

४) अपंग उमेदवार :- **परीक्षा शुल्क व्यतिरिक लेखनिक हवा असल्यास १००/- रुपये स्वतंत्रपणे.**

**(ग) अर्ज करण्याची पध्दत :-**

१) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना http:// pwd.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन २ प्रतीमध्ये उपलब्ध आहे. (उमेदवाराची प्रत, व बँकेची सदर चलनाची प्रिंट काढुन उमेदवाराने आवश्यक तो फी बँकेत भरावी) सदरच्या २ प्रतीपैकी उमेदवारास त्यांची स्वत:ची प्रत S.B.I. बँकेकडुन परत मिळेल. त्यापैकी उमेदवारास प्रत अशा उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सादर करावी. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी केली जाणार नाही.

३) अर्ज सादर करण्याची (परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व Transaction ID नोंदविणे) संपुर्ण कार्यवाही विहीत केलेल्या कालावधीतच पुर्ण करणे आवश्यक आहे.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:चा फोटो व सही विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी उस्मानाबाद / बीड / लातुर जिल्हयातील एम.के.सी.एल. चे अधिकृत सेंटर ची मदत घेऊ शकतील. त्याची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६) बँकेमध्ये विहीत परीक्षा शुल्काचा चलनाव्दारे भरणा केल्यानंतर प्राप्त झालेल्या (Transaction ID) ची नोंद करावी.

७) अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

**जा.क्र.पशा/आ-१/ /२०१४**
कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,उस्मानाबाद
दिनांक / /
दुरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२८८२/८३

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद**
**तथा समन्वय अधिकारी**
**(उस्मानाबाद,बीड व लातुर करीता)**

प्रत :- मा.मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत :- अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद/औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत :- जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद यांना माहिती व कार्यवाहीसाठी सविनय सादर.
२/- कृपया वरील प्रमाणे रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेसाठीचा कालावधी अल्प असल्याने आपल्या कार्यालयास नांव नोंदणी केलेल्या माजी सैनिक / अंशकालीन उमेदवारांपैकी वरील संवर्गातील पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना आल्या स्तरावरुन परस्पर एम.के.सी.एल. च्या संबंधीत अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्ती व स्विकृतीसाठी संपर्काच्या सुचना द्याव्यात ही विनंती. अशी यादी जरी या कार्यालयास पाठविली तरी तो विचारात घेतली जाणार नाही तो केवळ माहितीसाठी ठेवली जाईल व त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी, हि विनंती.
प्रत :- जिल्हारोजगार व स्वंयरोजगार केंद्र / जिल्हा समाज कल्याण अधिकारी, उस्मानाबाद यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२/- कृपया वरील प्रमाणे रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेसाठीचा कालावधी अल्प असल्याने आपल्या कार्यालयास नांव नोंदणी केलेल्या उमेदवारांपैकी वरील संवर्गातील पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना आल्या स्तरावरुन परस्पर एम.के.सी.एल. च्या संबंधीत अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्ती व स्विकृतीसाठी संपर्काच्या सुचना द्याव्यात ही विनंती. अशी यादी जरी या कार्यालयास पाठविली तरी तो विचारात घेतली जाणार नाही तो केवळ माहितीसाठी ठेवली जाईल व त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी, हि विनंती.
प्रत :- मा.जिल्हा माहिती अधिकारी,उस्मानाबाद/बीड/लातुर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी